(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] २ एस. सी. आर. ७०७

**स्टेट ऑफ यू. पी. अँड अदर्स**

*- विरुद्ध -*

**रामश-यराय यादव अँड अनादर**

१५ फेब्रुवारी, १९९६

[के. रामास्वामी आणि जी. बी. पटनायक, न्यायमूर्ती]

*सेवा कायदाः*

*रोजगाराच्या बाबतीत समानता - समान कामासाठी समान वेतन - लागू होण्याचे तत्त्व - तात्पुरते नियुक्त - अत्यावश्यक अर्हता, भरतीची पद्धत आणि कर्तव्ये - नियमित नियुक्त झालेल्यांपेक्षा वेगळी - असा निर्णय देण्यात आला की - हे तत्त्व तेव्हाच लागू होते जेव्हा समान स्थितीत असलेल्या आणि समान कार्ये पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या दोन गटांना वेगवेगळे वेतनमान मिळते - त्यामुळे, पहिल्या गटाला दुसऱ्या गटासह वेतनात तुल्यतेचा हक्क नसतो - भारताचे संविधान - अनुच्छेद ३९(डी).*

*भारताचे संविधान, १९५० : अनुच्छेद २२६*

*महत्त्वाची वस्तुस्थिती उघड न करणे - तात्पुरते नियुक्त - नियुक्ती रद्द केली - उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार सेवेत कायम राहणे - ही वस्तुस्थिती उघड न करता, नियमित नियुक्तांच्या वेतनात तुल्यता मिळावी यासाठी आणखी एक रिट याचिका दाखल केली - असा निर्णय देण्यात आला की, सदरचे तथ्य उघड न केल्याने त्यांना त्यानंतरच्या रिट याचिकेत कोणत्याही समन्यायिक अनुतोष मिळू शकण्याची हक्क काढून टाकण्यात आला.*

**उत्तरवादींची निश्चित परिश्रमिकावर अन्वेषक-सह-संगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, अशी पदे राज्यातील केवळ १५ जिल्ह्यांमध्ये तात्पुरत्या योजने अंतर्गत निर्माण करण्यात आल्या होत्या. त्या पूर्णपणे तात्पुरते पद भरण्यासाठी व्यक्तींची निवड करताना, एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजने प्रायोजित केलेल्या नावांच्या प्रकरणांचा विचार करण्याव्यतिरिक्त संचालनालयाच्या समुचित प्राधिकरणाला अनेक अर्ज थेट प्राप्त झाले आणि शेवटी उत्तरवादींची निवड करण्यात आली. अनियमिततेची माहिती मिळाल्यानंतर**

सरकारने नियुक्त्या रद्द केल्या आणि प्राधिकाऱ्यांना विहित प्रक्रियेनुसार व्यक्तींची निवड करण्याचे आवाहन केले.

उत्तरवादी-नियुक्तांनी रद्द करण्याच्या उपरोक्त आदेशाविरूद्ध उच्च न्यायालयात धाव घेतली आणि आरोप केला की त्यांना रुजू केल्याने, हा आदेश विधिदुष्ट आहे. उच्च न्यायालयाने उत्तरवादींना कायम ठेवण्यास अनुमत देणारा अंतरिम आदेश पारित केला. जरी सरकार उक्त कार्यवाहीत हजर झाले होते व स्थगिती विलोपनासाठी अर्ज दाखल केला, तरी स्थगिती आदेशाचे विलोपन करण्यात आले नाही व उतरवादींची सेवा चालू ठेवली. दरम्यान, उत्तरवादींनी आणखी एक रिट याचिका दाखल केली, ज्यात 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वाचे आवाहन करीत असा दावा केला गेला की अन्वेषक-सह-संगणक यांना संचालनालयात मिळणाऱ्या पगाराइतकाच पगार मिळण्याचा त्यांना हक्क आहे, विशेषतः जेव्हा ते नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच कर्तव्ये पार पाडित होते. त्या कारवाईत राज्य सरकारला नोटीस बजावण्यात आले असले तरी कोणतेही प्रतिशपथपत्र दाखल करण्यात आले नाही.

अपीलकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली असली तरी उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार उत्तरवादींना काम सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती आणि ज्या योजनेअंतर्गत त्यांची नियुक्ती करण्यात आली होती ती योजना अंमलात नसली तरी, उच्च न्यायालयाने सरकारला उत्तरवादींना नियमित संवर्गातील लोकांप्रमाणेच पगार देण्याचे निर्देश देण्यात चूक केली; आणि अन्वेषक-सह-संगणक ज्या पदावर उत्तरवादींना नियुक्त केले गेले होते, ते पद निश्चित पगारासह पूर्णपणे तात्पुरते स्वरूपाचे होते, त्यासाठी आवश्यक अर्हता नियमित हि नियमित पदेच्या अर्हतेपेक्षा खूपच कमी होती, तसेच निवड करण्याची पद्धत आणि कर्तव्ये नियमीत पदांपेक्षा वेगळी असल्याने, उच्च न्यायालयाने सरकारला उत्तरवादींना नियमित अन्वेषक-सह-संगणक यांना देण्यात येणाऱ्या वेतनमाना एवढेच पगार देण्याचे निर्देश देण्यात चूक केली.

उत्तरवादींच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की अपीलकर्त्यांनी उच्च न्यायालयात प्रतिशपथपत्र दाखल केले नसल्यामुळे त्यांच्याकडे रिट याचिकेत केलेले दावे स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता; हे न्यायालय संविधानाच्या अनुच्छेद १३६

अंतर्गत त्यात हस्तक्षेप करणे न्याय्य ठरणार नाही; त्यांच्या कामाचे स्वरूप नियमित अन्वेषक-सह-संगणकने केलेल्या कामासारखेच होते; आणि उच्च न्यायालयाला 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वाचे पालन करणे न्याय्य होते.

अपील अनुमत करीत, या न्यायालयाने

असा निर्णय दिला की : १.१. समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व तेव्हाच आकर्षित होते जेव्हा कर्मचाऱ्यांचे दोन गट समान स्थितीत असतात आणि समान कार्ये पार पाडत असतात परंतु तरीही त्यांना प्राप्त होणारे वेतनमान वेगवेगळे असते. प्रस्तुत प्रकरणात अन्वेषक-सह-संगणक पदे पूर्णपणे तात्पुरत्या आधारावर तयार करण्यात आल्या होत्या. या पदासाठी आवश्यक अर्हता इंटरमिजिएट होती, तर नियमित अन्वेषक-सह-संगणकासाठी आवश्यक अर्हता म्हणजे सांख्यिकी किंवा गणितीय सांख्यिकी किंवा गणिताची पदवी अशी होती. अन्वेषक-सह-संगणकासाठी देवनागरी लिपीत लिहिलेले हिंदीचे ज्ञान असणे आवश्यक अर्हता होती, जी उत्तरवादींनी धारण केलेल्या पदासाठी विहित केलेली नव्हती. उत्तरवादींनी धारण केलेल्या पदांवर भरतीची पद्धत विभागीय निवड समितीद्वारे होती तर नियमित अन्वेषक-सह संगणक भरतीची पद्धत राज्य लोकसेवा आयोग किंवा राज्य अधीनस्थ सेवा निवड मंडळाद्वारे करण्यात येते. उत्तरवादींच्या कर्तव्यांचे स्वरूप हे केवळ राज्यातील १५ जिल्ह्यांमधून पशुधन संख्या आणि पशुधन उत्पादनांसाठीची माहिती गोळा करणे हे होते, तर नियमित अन्वेषक-सह संगणकाचे कर्तव्य (१) जिल्हे, पशुधन शेते आणि इतर पशुधन संस्थांकडून माहिती गोळा करणे (२) सारणीबद्ध माहिती पूर्ण करणे, सारणीबद्ध करणे, सारणीबद्ध माहितीची छाननी आणि विश्लेषण करण्यात मदत करणे आणि (३) इतर विभागीय क्षेत्रीय कर्मचारीवर्ग सांख्यिकीय कामाचे निरीक्षण करणे, अशी होते. उपरोक्त आधार विधानात 'समान कामासाठी समान वेतन' हे तत्त्व आकर्षित केले जाऊ शकते असे मानणे कठीण आहे. नियमित अन्वेषक-सह संगणकाला दिल्या जाणाऱ्या वेतनमाना इतकेच वेतनमान उतरवादींना देण्याचे निर्देश अपीलकर्त्यांना देताना उच्च न्यायालयाने पूर्णपणे चूक केली. [७११ - एच, ७१२-ए-ई]

१.२. आधीच्या कार्यवाहीतील अंतरिम आदेश विलोपीत करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला असला तरी, सध्याच्या कार्यवाहीत अपीलकर्त्यांनी उच्च

**न्यायालयात कोणतेही प्रतिशपथपत्र दाखल केले नाही यात शंका नाही. यापूर्वीची कार्यवाही राज्य सरकारने अन्वेषक-सह-संगणक पदावरील नियुक्ती रद्द करण्याच्या आदेशाशी संबंध होती आणि त्या कार्यवाहीतील अंतरिम आदेशामुळे उत्तरवादी कायम आहेत. उत्तरवादींनी नंतरच्या कार्यवाहीत ही वस्तुस्थिती उघड केली नाही, जेव्हा त्यांनी नियमित अन्वेषक-सह-संगणक म्हणून समान वेतनाचा दावा केला. सदरचे तथ्य उघड न केल्याने त्यांना त्यानंतरच्या रिट याचिकेत कोणत्याही समन्यायिक अनुतोष मिळू शकण्याची हक्क काढून टाकण्यात आला. [७११ - एफ-एच]**

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ३३६६/१९९६.

दुसरे अपील कर. ५३४/१९९४ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने दि. ०२/०२/१९९५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी ए. के. श्रीवास्तव.

उत्तरवादींसाठी विजय बहुगुणा, गुडविल इंडीवर आणि एस. पी. सिंग.

न्यायालयाचा न्यायनिर्णय, जी. बी. पटनायक, न्यायमूर्ती यांनी दिला. अनुज्ञा देण्यात आली.

हि अपील विशेष अनुज्ञेद्वारे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांची अपील खारीज करीत, दिवाणी संकीर्ण रिट याचिका क्र. ३२००१/१९९२ मध्ये विद्वान एकल न्यायधिशांनी दिलेल्या निर्णयाला दुजोरा देत दि. ०२/०२/१९९५ रोजीच्या न्यायनिर्णयाने विरुद्ध करण्यात आली होती. न्यायिक प्रक्रिया गैरवापराचे हे एक ठळक उदाहरण आहे, जे अंशतः राज्य अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे आहे.

उत्तरवादींना दर महा रु. ४००/- एवढ्या निश्चित मानधनावर अन्वेषक-सह-संगणक म्हणून दि. १७/०९/१९८६ रोजीच्या आदेशान्व्ये नियुक्त करण्यात आले असून, अशी पदे केवळ दि. २८ फेब्रुवारी १९८७ रोजी पर्यंत उत्तर प्रदेशातील १५ जिल्ह्यांमध्ये तात्पुरत्या योजने अंतर्गत तयार करण्यात आल्या होत्या. त्या पूर्णपणे तात्पुरते पद भरण्यासाठी व्यक्तींची निवड करताना, एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजने प्रायोजित केलेल्या नावांच्या प्रकरणांचा विचार करण्याव्यतिरिक्त, पशुसंवर्धन संचालनालयाच्या समुचित प्राधिकरणाला २०८ अर्ज थेट प्राप्त झाले आणि शेवटी त्यापैकी ४४ व्यक्तींची निवड करण्यात आली. वर नमूद केल्याप्रमाणे अनियमिततेची माहिती मिळाल्यानंतर सरकारने

दि. ०६/०३/१९८७ रोजी च्या आदेशाद्वारे नियुक्त्या रद्द केल्या आणि अधिकाऱ्यांना विहित प्रक्रियेनुसार व्यक्तींची निवड करण्याचे आवाहन केले. नियुक्त झालेले-उत्तरवादींनी रद्द करण्याच्या आदेशाविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली आणि आरोप केला की ते रुजू झाले आहेत, म्हणून सदरचा आदेश हा विधिदुष्ट आहे. उच्च न्यायालयाने दि. १४/०८/१९८७ रोजी एक अंतरिम आदेश पारित केला ज्याने उत्तरवादीं ची सेवा चालू ठेवण्याचे अनुमत करण्यात आले. जरी सरकार उक्त कार्यवाहीत हजर झाले होते व स्थगिती विलोपनासाठी अर्ज दाखल केला, तरी स्थगिती आदेशाचे विलोपन करण्यात आले नाही व उतरवादींची सेवा चालू ठेवली. दरम्यान, उत्तरवादींनी आणखी एक रिट याचिका दाखल केली, ज्यात 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वाचे आवाहन करीत असा दावा केला गेला की अन्वेषक-सह-संगणक यांना संचालनालयात मिळणाऱ्या पगाराइतकाच पगार मिळण्याचा त्यांना हक्क आहे, विशेषतः जेव्हा ते नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच कर्तव्ये पार पाडित होते. त्या कारवाईत राज्य सरकारला नोटीस बजावण्यात आले असले तरी कोणतेही प्रतिशपथपत्र दाखल करण्यात आले नाही. त्यामुळे विद्वान एकल न्यायाधीशांनी दि. ०३/०३/१९९४ रोजीच्या आदेशाद्वारे उत्तरवादींना नियमित वेतनमान रु. १२०० - २०४० एवढे मान्य केले. सरकारने खंडपीठासमोर विशेष अपील दाखल केले आणि आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे विशेष अपील खारीज केल्याने विशेष अनुज्ञेद्वारे सध्याचे अपील या न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

अपीलकर्त्यांच्या वतीने त्याच्या विद्वान अधिवक्ताने असा युक्तिवाद केला की, त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली असली तरी उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार उत्तरवादींना काम सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती आणि ज्या योजनेअंतर्गत त्यांची नियुक्ती करण्यात आली होती ती योजना अंमलात नसली तरी, उच्च न्यायालयाने सरकारला उत्तरवादींना नियमित संवर्गातील लोकांप्रमाणेच पगार देण्याचे निर्देश देण्यात चूक केली. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अन्वेषक-सह-संगणक ज्या पदावर उत्तरवादींना नियुक्त केले गेले होते, ते पद दर महा रु. ५००/- एवढ्या निश्चित पगारासह पूर्णपणे तात्पुरते स्वरूपाचे होते, त्यासाठी आवश्यक अर्हता नियमित हि नियमित पदेच्या अर्हतेपेक्षा खूपच कमी होती, तसेच निवड करण्याची पद्धत

आणि कर्तव्ये नियमीत पदांपेक्षा वेगळी असल्याने, उच्च न्यायालयाने सरकारला उत्तरवादींना नियमित अन्वेषक-सह-संगणक यांना देण्यात येणाऱ्या वेतनमाना एवढेच पगार देण्याचे निर्देश देण्यात चूक केली. उत्तरवादींच्या वतीने प्रतिशपथपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरच्या प्रतिशपथपत्रामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, सरकारने विद्वान एकल न्यायधीशांसमक्ष कोणतेही विवरणपत्र दाखल केले नसल्यामुळे उच्च न्यायालयाकडे त्या अर्जात केलेले दावे स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे हे न्यायालय संविधानाच्या अनुच्छेद १३६ अंतर्गत त्यात हस्तक्षेप करणे न्याय्य ठरणार नाही. पुढे असे स्पष्ट केले गेले आहे की उत्तरवादींच्या कामाचे स्वरूप नियमित अन्वेषक-सह-संगणकने केलेल्या कामासारखेच होते; आणि उच्च न्यायालयाला 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वाचे पालन करणे न्याय्य होते.

आधीच्या कार्यवाहीतील अंतरिम आदेश विलोपीत करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला असला तरी, सध्याच्या कार्यवाहीत सरकारने उच्च न्यायालयात कोणतेही प्रतिशपथपत्र दाखल केले नाही यात शंका नाही. यापूर्वीची कार्यवाही राज्य सरकारने अन्वेषक-सह-संगणक पदावरील नियुक्ती रद्द करण्याच्या आदेशाशी संबंध होती आणि त्या कार्यवाहीतील अंतरिम आदेशामुळे उत्तरवादी कायम आहेत. उत्तरवादींनी नंतरच्या कार्यवाहीत ही वस्तुस्थिती उघड केली नाही, जेव्हा त्यांनी नियमित अन्वेषक-सह-संगणक म्हणून समान वेतनाचा दावा केला. सदरचे तथ्य उघड न केल्याने त्यांना त्यानंतरच्या रिट याचिकेत कोणत्याही समन्यायिक अनुतोष मिळू शकण्याची हक्क काढून टाकण्यात आला. मूळ कार्यवाही अद्याप प्रलंबित असल्याने आम्ही रद्द करण्याच्या आदेशाच्या कायदेशीरतेवर कोणतेही मत व्यक्त करत नाही, जरी अपीलकर्ते - राज्यच्या विद्वान वकिलाने उपस्थित केलेल्या युक्तिवादात काही बळ असले तरी. परंतु अभिलेखावरील पुराव्यानुसार असा निष्कर्ष काढला जाऊ शकत नाही की उत्तरवादींना नियमित अन्वेषक-सह-संगणकच्या समान वेतनमानाचा दावा करण्याचा अधिकार नाही. समान कामासाठी समान वेतनाचे तत्त्व तेव्हाच आकर्षित होते जेव्हा कर्मचाऱ्यांचे दोन गट समान स्थितीत असतात आणि समान कार्ये पार पाडत असतात परंतु तरीही त्यांना प्राप्त होणारे वेतनमान वेगवेगळे असते. प्रस्तुत प्रकरणात अन्वेषक-सह-संगणक पदे पूर्णपणे तात्पुरत्या आधारावर तयार करण्यात आल्या होत्या. या

पदासाठी आवश्यक अर्हता इंटरमिजिएट होती, तर नियमित अन्वेषक-सह-संगणकासाठी आवश्यक अर्हता म्हणजे सांख्यिकी किंवा गणितीय सांख्यिकी किंवा गणिताची पदवी अशी होती. अन्वेषक-सह-संगणकासाठी देवनागरी लिपीत लिहिलेले हिंदीचे ज्ञान असणे आवश्यक अर्हता होती, जी उत्तरवादींनी धारण केलेल्या पदासाठी विहित केलेली नव्हती. उत्तरवादींनी धारण केलेल्या पदांवर भरतीची पद्धत विभागीय निवड समितीद्वारे होती तर नियमित अन्वेषक-सह संगणक भरतीची पद्धत राज्य लोकसेवा आयोग किंवा राज्य अधीनस्थ सेवा निवड मंडळाद्वारे करण्यात येते. उत्तरवादींच्या कर्तव्यांचे स्वरूप हे केवळ राज्यातील १५ जिल्ह्यांमधून पशुधन संख्या आणि पशुधन उत्पादनांसाठीची माहिती गोळा करणे हे होते, तर नियमित अन्वेषक-सह संगणकाचे कर्तव्य (१) जिल्हे, पशुधन शेते आणि इतर पशुधन संस्थांकडून माहिती गोळा करणे (२) सारणीबद्ध माहिती पूर्ण करणे, सारणीबद्ध करणे, सारणीबद्ध माहितीची छाननी आणि विश्लेषण करण्यात मदत करणे आणि (३) इतर विभागीय क्षेत्रीय कर्मचारीवर्ग सांख्यिकीय कामाचे निरीक्षण करणे, अशी होते. उपरोक्त आधार विधानात 'समान कामासाठी समान वेतन' हे तत्त्व आकर्षित केले जाऊ शकते असे मानणे कठीण आहे. नियमित अन्वेषक-सह संगणकाला दिल्या जाणाऱ्या वेतनमाना इतकेच वेतनमान उतरवादींना देण्याचे निर्देश अपीलकर्त्यांना देताना उच्च न्यायालयाने पूर्णपणे चूक केली. उपरोक्त आधारविधानावर विशेष अपील क्र. ५३४/१९९४ मधील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा आक्षेपीत निकाल तसेच रिट याचिका क्र. ३२००१/१९९२ मधील विद्वान एकल न्यायाधीशाचा निर्णय रद्दबातल करण्यात आला आहे. पुढे असा निर्णय देण्यात आला आहे की उत्तरवादी हे नियमित अन्वेषक-सह संगणकासाठी उपलब्ध असलेल्या वेतनमानाकरिता पात्र नाहीत. अपील अनुमत करण्यात येत आहे परंतु ह्या परिस्थितीत वादखर्चाबाबत कोणताही आदेश न देता.

व्ही. एस. एस.

अपील अनुमत करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या  न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय  हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता  विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."